पनवेल (प्रतिनिधी) शासनाच्या माध्यमातून फक्त शहरातच नव्हे तर तालुक्यातील प्रत्येक गावात पायाभूत सोयीसुविधा देण्याचे काम मला करता आले, ते कार्यकर्ते व नागरिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले असून आदिवासी वाडीसारख्या दुर्गम भागात वीज तसेच सर्व प्रकारच्या सुविधा देण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिंध्रण येथे मंगळवारी केले.

वाढती वीज जोडणी व जुन्या जनित्रामुळे चिंध्रण गावात कमी दाबाने वीज पुरवठा होत होता. गावातील वीज पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर तसेच शिरवली कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे आणि कार्यकर्त्यांनी वीज वितरण कंपनीकडे केलेल्या पाठपुराव्यातून चिंधण गावाला नवीन जादा विद्युत जनित्र बसविण्यात आला असून त्याचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, मागील कॉंग्रेस आघाडी केंद्र सरकारने देशातील प्रत्येक गावात वीज पुरवठा पायाभूत सुविधा देण्याचा निर्णय घेवून त्याची अमंलबजावणी सुरू केली त्यानुसार देशभरात पायाभूत सुविधा देण्याचे काम सुरू आहे. ही कामे चांगल्या दर्जाची झाली पाहिजेत त्याचा वापर योग्यरित्या झाला पाहिजे ही आपण आग्रही मागणी धरली आहे. नुकताच एमएमआरडीएच्या माध्यमातून १६१ कोटी रूपयांच्या विकासकामांना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मंजूरी दिली. आहे त्यामुळे पनवेलच्या विकासामध्ये आणखी भर पडणार असून ज्येष्ठांचे आशिर्वाद तसेच कार्यकर्ते, महिला व युवकांचे आणि नागरिकांच्या खंबीर पाठिंब्यामुळे आपल्याला विधायक कामे करण्याची उर्जा मिळत असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. शिरवली विभागाकरिता ०१ कोटी ९६ लाख रूपयांचा निधी मुंख्यमंत्री सहाय्यता निधी मिळवून देण्यात आले ते कार्यकर्ते आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचे सांगून यापुढेही विकासाचा महारथ सुरूच ठेवू असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी महाराष्ट्र वीज वितरण कंपनी पनवेल शाखेचे कार्यकारी अभियंता दिलीप मेहेत्रे यांनी आपल्या भाषणातून आमदार प्रशांत ठाकूर तसेच शिवाजी दुर्गे यांच्या पाठपुराव्याचे कौतुक करून या गावातील वीज समस्या सोडविण्याचे काम त्यांच्या पाठपुराव्यातून केले असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी शिरवली जिल्हा परिषद कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिध्रण ग्रामपंचायत हद्दीतील गावांमध्ये ६४ लाख रूपयांची विकासकामे केली असून त्याचबरोबरीने शिरवली विभागासाठी आणखी दोन कोटी रूपयांचा निधी त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिला असून या विभागातही मोठया प्रमाणात विकासगंगा आणण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असल्याचे म्हंटले. सामाजिक जाण आणि जबाबदारीचे भान ठेवून आमदार प्रशांत ठाकूर काम करीत असून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी दिवसातून १६ ते १८ तास काम करणारा कार्यतत्पर लोकप्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने पनवेल विधानसभा मतदार संघाला लाभले असून मतदार संघातील शहरासोबतच गाव, खेडोपाडयात अनेक विकासकामे करण्याचे काम ते करीत आहेत, असेही दुर्गे म्हणाले.

यावेळी ग्रामस्थांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करून यापुढेही त्यांना विधायक कामे करण्याकरिता निरोगी व उदंड आयुष्य लाभो, अशा शब्दात आपले ऋणनिर्देश केले. या कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता शाम गायथडक, शाखा अभियंता जितेंद्र पाटील, गौरव भोईर, ग्रामपंचायत सदस्या रमन कडू, नामदेवशेठ, गणपत दुर्गे, जगन्नाथ पाटील, राजेंद्र पाटील, चंद्रकांत पाडेकर, यशोदा पाटील, उदय पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.